सोबत उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील जी वसतीगृहे विद्यापीठ व महाविद्यालयांच्या ताब्यात आहेत व सुस्थितीत आहेत अशी वसतीगृहे सुरु करण्यास शासनाने मान्यता दिली असल्याबाबत मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/२०२१/४८९ दिनांक २२/१२/२०२१ अन्वये या कार्यालयास प्राप्त झालेल्या आहे. (सोबत प्रत जोडलेली आहे.) कृपया त्याचे अवलोकन करावे व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

क्रमांक : तंशिविकाअ/शिक्षण /२०२१/ 2365
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती.
दि. 23 DEC 2021

प्रति,

१. प्राचार्य, सर्व शासकीय/अनुदानित/विद्यापिठ सलग्नीत/विना-अनुदानित तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था, पदविका/पदवी / पदव्युत्तर पदवी संस्था, अमरावती विभाग अमरावती यांनी सोबत जोडलेल्या मा. तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांच्या पत्राचे अवलोकन करुन त्याप्रमाणे आवश्यक कार्यवाही करण्याचे दृष्टीने अग्रेषित.

सहपत्र :- वरिल प्रमाणे.

प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण,विभागीय कार्यालय,
अमरावती.

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०,
ई-मेल - desk2a@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/ २०२१/ ८८९ दिनांक : 22 DEC 2021

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर,

विषय :- विद्यापीठ/महाविद्यालयातील वसतीगृहे सुरू करण्याबाबत...

संदर्भ : शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०२१/प्र.क्र.०६/विशि-३, दिनांक २०.१२.२०२१

विद्यापीठ/महाविद्यालयातील वसतीगृहे सुरू करण्याबाबत शासनाचे संदर्भाधीन पत्र कृपया पहावे.

ज्या विद्यार्थ्यांनी लसीचे दोन डोस घेतले आहेत अशा विद्यार्थ्यांकरिता कोव्हिड-१९ च्या व्यवस्थापनाबाबतचे राष्ट्रीय निदेश, कामांच्या ठिकाणांबाबतचे अतिरिक्त निदेश , राज्य शासनाने वेळोवेळी दिलेली मार्गदर्शक तत्वे किंवा मानक कार्य प्रणाली (एसओपी) तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या अधीन राहून, उच्च शिक्षण व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील जी वसतीगृहे विद्यापीठ व महाविद्यालयाच्या ताब्यात आहेत व सुस्थितीत आहेत अशी वसतीगृहे सुरू करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

वरील बाब आपल्या अधिपत्याखालील सर्व तांत्रिक व्यावसायिक पदविका,पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या निदर्शनास आणण्यात यावी व त्यांचेकडील वसतीगृहे वरील निकषानुसार सुरु करण्याचे निर्देश तात्काळ देण्यात यावेत.

( डॉ.अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : कार्यासन क्रमांक २,९,१० मुख्य कार्यालय,मुंबई यांना माहितीकरिता

E:\Budage\2021-22\General Correspondence\Start Hostel 22.12.2021.docx

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-४१८,**
**चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२**

दूरध्वनी क्र ०२२-२२७९३१७१ Email ID - hted.vishi3-mh@gov.in


---

क्रमांक: संकीर्ण-२०२१/प्र. क्र.०६/विशि-३ दिनांक : २० डिसेंबर, २०२१.

प्रति,

संचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,
पुणे.

विषयः- विद्यापीठ/ महाविद्यालयातील वसतिगृहे सुरु करणेबाबत.
संदर्भः- आपले पत्र क्र.युएनआय/(८२/२१)/विशि-१/भाग-२/१३५२४,
दिनांक १८ नोव्हेंबर, २०२१.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांनी लसीचे दोन डोस घेतले आहेत अशा विद्यार्थ्यांकरिता, कोव्हिड-१९ च्या व्यवस्थापनाबाबतचे राष्ट्रीय निदेश, कामांच्या ठिकाणांबाबतचे अतिरिक्त निदेश, राज्य शासनाने वेळोवेळी दिलेली मार्गदर्शक तत्त्वे किंवा मानक कार्य प्रणाली (एसओपी) तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या अधीन राहून, उच्च शिक्षण व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील जी वसतीगृहे विद्यापीठ व महाविद्यालयाच्या ताब्यात आहेत व सुस्थितीत आहेत अशी वसतीगृहे सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यास अनुसरुन आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

आपला,

(अ.म.बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.